20-21

ISSN 2278-5655
SJIF Impact Factor : 7.372
Volume-X, Issues- I

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

# AMIERJ

## AARHAT MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL EDUCATION RESEARCH JOURNAL

Peer Reviewed Journal

Chief-Editor: Dr.Rajendra Patil

ISSN-2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-X, Issues- I Jan-Feb 2021


| | | | |
|---|---|---|---|
| 28 | डॉ.विद्या शशिशेखर शिंदे | समकालीन मन्नू भंडारीजी की कहानियो में चित्रित महानगरीय जीवन | 244 |
| 29 | डॉ.राजेंद्र भीमराव भालेराव | औरंगाबाद जिल्ह्यातील स्त्री पुरुष प्रमाण (Sex - Ratio ) एक भौगोलिक अभ्यास | 251 |
| 30 | डॉ.सुनील रजपूत | बौद्ध धम्म आणि धम्म परिषदा | 257 |
| 31 | Noor Aisha & Amiteshwar Ratra | Technology Integration through National Education Policy 2020: Implementation of Blended learning for Equitable Quality Education | 262 |
| 32 | Mr. Vijayanand P Bansode | Mahatma Phule's Educational Thought For The Egalitarian Society: A Critical Survey | 273 |
| 33 | Dr. Pulla Lakshmi & Dr. G. Mythili | Training Needs Assessment of Teachers and Academics of Indira Gandhi National Open University | 280 |
| 34 | Dr. Rabi Narayan Behera | The terrain tradition and cropping pattern practices: mapping the changes across the farming systems in Meghalaya Plateau | 299 |
| 35 | Nisha Kutty and Sujata Bhan | Effectiveness of Method of Loci technique on Memory of children with learning difficulties | 310 |


CC BY Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/

Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

ISSN-2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-X, Issues- I Jan-Feb 2021

# बौध्द धम्म आणि धम्म परिषदा

प्रा.डॉ.सुनिल रजपूत

*जवाहर महाविद्यालय, अणदूर ता.तुळजापूर.जि.उस्मानाबाद*

**प्रस्तावना :-**

इ.स.पू. 6 वे शतक हे प्राचीन भारताच्या इतिहासातील एक कांतीकारी शतक मानले जाते.या शतकाचे कांतीकारकत्व एक प्रचंड वैचारीक, परमार्थिक आणि अध्यात्मिक चिंतनात सामावलेले आहे. या चिंतनाने मुक्त असे तत्वचिंतनाचे वातावरण निर्माण केले [1].धार्मिक क्षेत्रात नवीन विचार रुजू लागले. वैदिक धर्म अतिशय गुंतागुंतीचा झाला होता. वैदिक धर्म त्यांच्या कर्मकांडातील जटीलतेमुळे घसरणीला

Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/

लागला होता. सर्वसामान्यांना त्या धर्माचे आकलन होत नव्हते. धर्मबाह्य कृत्यांना महत्व प्राप्त झाले होते. गौतम बुध्दांनी हिंसामुक्त यज्ञसंस्थेला पूर्णतया निरर्थक ठरविले आणि वेदांना अप्रमाण मानले.बाहय कर्मकांडांना बाजूला सारुन आत्मशुध्दी, तत्वचिंतन, नैतिक सदाचरण यांना महत्व देऊन वैचारीक कांती घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य सुरु झाले होते. मुक्तीचा मार्ग शोधण्याच्या प्रयत्नात नवे चिंतन सुरु झाले. अंतिम सत्याचा शोध घेतला जाऊ लागला. अनात्मवादी चिंतनातून अस्तित्व नाकारणारे, वेद प्रामाण्य नाकारणारे असे लोकायत, बौध्द आणि जैन हे तीन दर्शन विचार उदयाला आले.

या काळात एक प्रकारे धार्मिक कांतीच घडून आली होती. कारण भारताच्या भूमीत उदयास आलेले हे धर्म केवळ भारतापुरतेच मर्यादीत राहिले नाहीत तर या धर्माचा जगातील अनेक राष्ट्रात प्रचार आणि प्रसार घडून आला. या धर्माने समाजात परिवर्तन करण्याचे मोठे कार्य केले.

- **धर्म आणि धम्म संकल्पना : –**

भगवान बुध्दाचा धम्माचा हेतू अविद्या नष्ट करणे हा होता. अविद्या म्हणजे दुःखाच्या अस्तित्वा विषयीचे अज्ञान होय. भगवान बुध्दाच्या धम्मात मानवी दुःखाचा अंत करण्याचा मार्ग दाखविला होता.[2] म्हणून भगवान गौतम बुध्दाच्या धम्माचा विचार कराताना धर्म आणि धम्म या संकल्पना समजून घेणे आवश्यक आहे.

- **धर्म म्हणजे काय? :-**

ईश्वर, आत्मा, स्वर्ग, नरक, पूर्वजन्म, पुर्नजन्म, ईश्वराची भक्ती आणि मोक्ष या गोष्टींनी मिळून धर्म बनतो. प्रार्थना, पूजा, कर्मकांड, विधी, सण समारंभ, यज्ञ हे धर्माचे विषय असतात.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

ISSN-2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume-X, Issues-I Jan-Feb 2021

तुम्ही ईश्वराची लेकरे आहात म्हणून तुम्ही एकमेकांशी चांगले वागा असे निती धर्म सांगतो. धर्माची भूमिका ही धारण्याची असते. धारणा आणि सुधारणा या दोन गोष्टी परस्परविरोधी आहेत. धर्माला सुधारणा मान्य नसते.[3]

एडवर्ड टायलर म्हणतो की, दैवी विभूतीच्या अस्तित्वावरील श्रध्दा म्हणजे धर्म होय.

आर.एन.मुखर्जी यांच्या मते धर्म म्हणजे कोणत्या ना कोणत्या अतिमानवी अलौकिक किंवा अतिसामाजिक शक्तीवरील विश्वास होय. [4]

धर्म हा व्यक्तिगत असून तो स्वतःसाठी पाळावयाचा असतो. परंतू धम्म हा सामाजिक आहे. धम्माचे स्वरुप पायाभूत व आवश्यक असे आहे. धम्मामध्ये सदाचार असून धम्म माणसा–माणसात योग्य नाते ठेवणारा असतो.

- **धम्म म्हणजे काय ?**

" जीवन शुचिता म्हणजे धम्म होय " जीवन शुचितेचे तीन प्रकार आहेत.

1. देह शुचिता -- माणसाने हिंसा, चोरी, मिथ्याचार याच्या पासून विरत होणे याला देहशुचिता म्हणतात.
2. वाकशुचिता: – असत्य भाषणापासून विरत होणे याला वाकशुचिता म्हणतात.
3. मनःशुचिता : – मनशुचितेत मनुष्य लोभ आणि इर्षा यापासून परावृत्त होऊन सम्यक दृष्टी धारण करतो. याला मनः सुचिता असे म्हणतात.[5]

याशिवाय धम्माच्या अनेक व्याख्या आहेत. निब्बाण प्राप्त करणे म्हणजे धम्म होय.[6] त्याग तृष्णा म्हणजे धम्म होय.[7] जीवनात पुर्णता साधने म्हणजे धम्म होय. त्या तीन प्रकारच्या असतात.

1. कायिक 2. वाचिक 3. मानसिक अशा परिमिता अंगी बाणणे म्हणजे धम्म होय.

याचाच अर्थ धर्म आणि धम्म या दोन भिन्न संकल्पना आहेत. त्या परस्पर विरोधी आहेत. बुध्द आणि त्याचा धम्म या ग्रंथात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीच या दोन संकल्पना मधील फरक स्पष्ट करुन दाखविला आहे. त्यावरुनच आपण हे स्पष्टपणे म्हटले पाहिजे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्म सोडला, पण त्या बदल्यात दुसरा कोणताही धर्म स्वीकारला नाही तर त्यांनी धम्म स्विकारला.[8]

- **धम्माचा अर्थ :–**

बुध्दाने त्यांच्या प्रवचनात धम्म हा अतिशय अर्थपूर्ण शब्द वापरला आहे. त्यांच्या दृष्टीने धम्म ही अगदी वेगळी संकल्पना आहे. इतर धार्मिक गटांनी धर्माची जी संकल्पना मांडली त्यापेक्षा वेगळा धम्म हा बुध्दाने सांगितला. उदात्त आणि योग्य जीवन जगण्यासाठी मानवी प्रतिष्ठा आणि बुध्दीमत्ता यांचे संवर्धन करण्यासाठी बुध्दाने धम्माच्या मार्गाने जाण्याची शिकवण दिली. व स्वतःला बौध्द म्हणून घेण्यासाठी कोणताही विधी बंधनकारक



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

ISSN-2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume-X, Issues- I Jan-Feb 2021

नाही, असे सांगितले.[9] यावरुन बौध्द धम्माचा साधेपणा लक्षात येतो.

भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म या धम्म ग्रंथाचा समारोप करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्द धम्माचा प्रसार खेडयापाडयातून करण्याची सर्व बौध्द बांधवांनी प्रतिज्ञा घ्यावी, असे आवाहन केले आहे.[10]

- **गौतम बुध्दाच्या धम्माची वैशिष्टयै :–**

गौतम बुध्दांचा धम्म ही त्यांची स्वतःची निर्मिती होती. त्यांनी स्थापन केलेल्या या धम्माची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत. बुध्दांनी या वैशिष्टयांचे प्रतिपादन सारनाथ येथील पहिल्या प्रवचनात केले होते.

1. बुध्दाच्या धम्माचा ईश्वर, आत्मा व कर्मकांडाशी कसलाही संबंध नाही. तसेच त्यांचा मरणोत्तर जीवनाशी ही कसलाच संबंध नाही.
2. माणूस व माणसाचे माणसाशी या जगातील नाते हा बुध्दाच्या धम्माचा केंद्रबिंदू आहे. हेच या धम्माचे पहिले अधिष्ठान आहे.
3. जगात सर्वत्र दुःख भरलेले आहे. जगातून हे दुःख नाहीसे करणे हा धम्माचा उद्देश आहे.
4. दुःखाचे अस्तित्व मान्य करणे व ते नष्ट करण्याचा मार्ग दाखविणे हा बुध्दांच्या धम्माचा पाया आहे.

या धम्मानुसार प्रत्येक माणसाने पवित्र्याचा मार्ग अनुसरला, सदाचाराचा मार्ग स्वीकारला व शील मार्गाचा अवलंब केल्यास दुःख नाहीसे करता येईल. "

- **भगवान बुध्दांच्या धम्म प्रचारांची केंद्रे :–**

भगवान बुध्द धम्मदूत होऊन धम्मप्रचारार्थ कार्यरत राहिले. त्यांनी अनेक धम्मदूतांची नियुक्ती केली. त्यांनी विशिष्ट स्थानांची आपल्या धम्म प्रचाराची केंद्रे म्हणून निवड केली होती. त्यामध्ये श्रावस्ती आणि राजगृह ही दोन प्रमुख केंद्रे होती. तसेच वैशाली हे सुध्दा धम्मप्रचार केंद्र होते. त्यांनी श्रावस्तीला पंच्याहत्तर वेळा, राजगृहाला चोवीस वेळा आणि वैशालीला सहा वेळेस भेटी दिल्या होत्या.

- **भगवान बुध्दांच्या महापरिनिर्वाणानंतरचे प्रचार कार्य :–**

वयाच्या 35 व्या वर्षी ज्ञान प्राप्त झाल्यावर भगवान बुध्दांनी आपले उर्वरीत आयुष्य लोकसेवेला व बौध्द धम्माच्या प्रचारासाठी खर्च केले. अनेक वर्षे सतत सेवा व प्रचारकार्य केल्यानंतर वयाच्या 80 व्या वर्षी इ.स. पु.487 मध्ये कुशीनगर येथे भगवान बुध्दांचे महापरिनिर्वाण झाले.

कोणत्याही महापुरुषाच्या मृत्यूनंतर समाजात पोकळी निर्माण होते, असे सर्वसामान्यांना वाटणे साहजिक आहे. परंतू भगवान गौतम बुध्दानंतर बौध्द धर्मियांना कोणीही आश्रयदाता राहिला नाही. त्यांनी मृत्यूपर्वी वारस नियुक्त करण्यास नकार देताना ते म्हणाले "माझ्यानंतर माझा धम्मच वारस असेल." या उत्तराचा गांभीर्याने विचार हाच माणसाला मार्ग दाखवू शकतो. भगवान बुध्दानंतर त्यांचा शिष्य आनंद यांनी धम्म हा शिरोधार्य



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College
Andur. Tal. Tuljapur Dist. Osmanabad

मानून बुध्दाच्या नंतरच्या काळातही सर्वांशी मैत्रीपूर्ण होऊन , सदाचार संपन्न होऊन धम्म प्रसार आणि प्रचाराचे कार्य केले.[12].

■ धम्म संगिती : –

धम्म संगिती या ग्रंथात धम्म संगितीचा अर्थ स्पष्ट करताना असे नमूद केले आहे की," बुध्द तत्वज्ञानाचे विवेचन आणि संकलन ज्याठिकाणी केले जाते, जेथे शेकडोंच्या संख्येने बौध्द भिक्षू एकत्र जमतात, धम्म तत्वज्ञानावर विचार विनिमय करतात त्या परिषदेस धम्मसंगिती असे म्हणतात.[13].

बुध्दानंतरच्या काळात चार धम्म संगिती झाल्या. बौध्दयन धम्म सूत्रात म्हटले आहे की, धर्मांच्या इतिहासात काळानुरुप काही प्रश्न निर्माण झालेले आढळतात. काही लोक जुन्या तत्वांना जुमानत नाहीत. हा मानवी प्रकृतीचा स्वभाव आहे. अशावेळी जुन्या तत्वांचा प्रमाणभूत संग्रह आणि नवीन तत्वांची अधिकृत माहिती देणे या उद्देशाने धर्मांतर्गत परिषदा झालेल्या दिसतात.[14]

बौध्द धम्माच्या इतिहासामध्ये या परिषदांना उद्देशून संगिती असा शब्द वापरला जातो. संगितीचा शब्दशः अर्थ एकत्रितपणे धार्मिक ग्रंथाचे पठन करणे असा आहे.

■ बौध्द धम्माच्या परिषदा :–

1. पहिली परिषदा –

बौध्द धम्माची पहिली परिषद राजगृह या ठिकाणी भगवान बुध्दांच्या महापरिनिवाणानंतर इ.स.पू. 483 साली बौध्द भिक्षू महाकश्यप यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. बौध्द धम्माच्या सिध्दांताचे संकलन करणे हा या परिषदेचा उद्देश होता. या परिषदेत आनंद व उपाली या भिक्षूंसह पाचशे भिक्षूंनी भाग घेतला होता. या परिषदेत बुध्दाची शिकवण व उपदेश यावर चर्चा करण्यात येऊन त्यांचे संकलन केले गेले. गौतमांच्या वचनांचे तीन भाग करण्यात आले. त्याला 'त्रिपिटक' म्हणतात. हर्यक वंशातील राजा अजातशत्रू याने ही परिषद यशस्वी करण्याचा प्रयत्न केला.

2. दुसरी परिषद :–

इ.स.पू.387 मध्ये दुसरी बौध्द धम्म परिषद वैशाली येथे भरली. या परिषदेत बौध्द धम्मात फूट पडून हीनयान व महायान या दोन पंथाचा उदय झाला. ही परिषद शिशूनाग वंशातील राजा कालाशोक याने आयोजित केली होती.

3. तिसरी परिषद : –

बौध्द धम्मातील निर्माण झालेले मतभेद दूर करण्यासाठी सम्राट अशोकाने इ.स.पू.251 मध्ये मोगलीपुत्त तिस्स या बौध्द पंडिताच्या अध्यक्षतेखाली तिसरी धम्म परिषद पाटलीपुत्र येथे आयोजित केली. या परिषदेस एक हजार भिक्षू हजर राहिले. ही परिषद नऊ महिने चालली. या परिषदेत बौध्द धम्मातील मतभेद दूर करण्यात येऊन 'अभिधम्मपिटक' ची रचना करण्यात आली.



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad

ISSN-2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– I

Jan-Feb 2021

4. चौथी परिषद : –

बौध्द धम्माची ही चौथी परिषद काश्मीर मध्ये कुंडलवन येथे सम्राट कनिष्काच्या कारकिर्दीत वसुमित्र यांच्या अध्यक्षतेखाली आणि महान कवी व तत्ववेत्ता अश्वघोष यांच्या सहकार्याने भरविण्यात आली. या परिषदेस पाचशे भिक्षू हजर होते. या परिषदेत त्रिपिटकावर तीन महाभाष्ये रचली गेली. ही तीन महाभाष्ये एका ताम्रपटावर कोरण्यात येऊन एका स्तुपामध्ये सुरक्षित ठेवली गेली. या परिषदेनंतर बौध्द धर्म हीनयान व महायान या दोन संप्रदायांमध्ये विभक्त झाला.[15]

अशाप्रकारे प्राचीन काळात बौध्द धम्माच्या विविध परिषदा झाल्या. आणि या परिषदांमधून बुध्दाची शिकवण, उपदेश यावर चर्चा झाली. बौध्द धम्माने भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेमध्ये महत्वाची भर टाकली. भारतीय जीवनाच्या विविध अंगाच्या जडणघडणीत या धम्माने महत्वाची भूमिका पार पाडली आहे. भरताच्या सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, साहित्यिक आणि राजनैतिक इत्यादी क्षेत्रात बौध धम्माचा फार मोठा प्रभाव पडलेला आहे.

**संदर्भ सुची :–**

देव प्रभाकर, प्राचीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती, 1993, पृ.56,57

मनोहर यशवंत, धम्म कांतीची 50 वर्ष , युगसाक्षी प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती, 5 जून 2006 पृ.5

आंबेडकर भिमराव रामजी, भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, धम्म शासन विश्व विद्यापीठ पब्लिकेशन, 1997, विशेष आवृत्ती, भाग 3 रा. पृ.176, 177

कराडे जगन्नाथ (संपा), धम्म कांतीची फलश्रृती, तक्षिला प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती 14 आक्टरे 2006 पृ.11

कित्ता पृ.178

कित्ता पृ178

मनोहर यशवंत, धम्म कांतीची 50 वर्ष, युगसाक्षी प्रकाशन नागपूर, पहिली आवृत्ती, 5 जून 2006 पृ.6

आंबेडकर भिमराव रामजी, भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, धम्म शासन विश्व विद्यापीठ पब्लिकेशन, 1997, विशेष आवृत्ती, भाग 3 रा. पृ.176, 177

आंबेडकर भिमराव रामजी, भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, धम्म शासन विश्व विद्यापीठ पब्लिकेशन, 1997, विशेष आवृत्ती, भाग 3 रा. पृ.176, 177

वाघ विलास (अनु), बौध्द धम्माचे आचरण कसे करावे, सुगावा प्रकाशन पुणे, धम्मचक्र प्रवर्तन, सुवर्ण महोत्सवी वर्ष, 2006, पृ. 6–7

डॉ.आंबेडकर बाबासाहेब, भगवान बुध्द आणि त्यांचा धम्म, सिध्दार्थ प्रकाशन, पिपल्स एज्युकेशन सोसायटी, आनंदभवन, फोर्ट मुंबई, वर्ष 1982, पृ.20



Principal
Jawahar Arts, Science & Commerce College,
Andur Tal. Tuljapur Dist, Osmanabad